# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सह. साखर कारखाना लि; अमृतनगर

पो. संगमनेर एस. के. ४२२६०८, तालुका- संगमनेर, जिल्हा- अहमदनगर
तार- संगमसाकर, फोन :- २२५३७०, २२५३९९, २२५४५७
फॅक्स नं. ०२४२५ - २२५४२५
ई-मेल : amrutsugar@yahoo.co.in वेबसाईट : www.thoratsugar.com




जावक नंबर : सभाथोससाका/शेतकी/३५५२/२०१८

दिनांक : ०१/१२/२०१८

## परिपत्रक

## सन २०१९-२०२० गळीताचे सुरु व खोडवा ऊसासाठी अनुदान योजना

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कळविण्यात येते की, यावर्षी आपले कारखाना कार्यक्षेत्रात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झालेमुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. परिणामी ऊस लागवडीचे क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. ज्या शेतकऱ्यांकडे शाश्वत पाण्याची उपलब्धता आहे त्यांनी ईतर पिकांच्या बाजारभावाचा विचार करता हमी भाव योग्य प्रकारे मिळणारे ऊस पिक घेणेच फायदेशीर ठरणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता कमी आहे त्यांनी सन २०१८-१९ गळीत हंगामातील ऊस तोडणी झाल्यानंतर फक्त ऊस पिकाचा जास्तीत जास्त खोडवा ठेवणेच फायदेशीर ठरणार आहे. तसेच नेहमीच्या पारंपारीक पध्दतीपेक्षा ठिबक सिंचन पध्दतीने ऊस लागवड केल्यास पाण्याची बचत होऊन अधिक उत्पादन व गुणवत्तेचा ऊस तयार होईल. पाण्याची बचत झाल्यामुळे ऊस लागवड क्षेत्रात व ऊस उत्पन्नात वाढ होणार आहे. सन २०१९-२० चे हंगामाकरीता कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध होण्याचे दृष्टीने सुरु ऊस लागवडीत व खोडवा क्षेत्रात वाढ होण्याकरीता मा. संचालक मंडळाने सन २०१९-२० गळीताचे ऊसासाठी खालीलप्रमाणे अनुदान देण्याचे धोरण घेतलेले आहे.

**१) सुरु ऊस लागवड :-** सन २०१९-२० गळीताचे दि. ०१/१२/२०१८ ते ३०/०४/२०१९ अखेर होणाऱ्या सुरु ऊस लागवडीसाठी (कोएम. ०२६५ करीता दि. ०१/१२/२०१८ ते २८/०२/२०१९ अखेर होणारी लागवड) ऊस गळीतास आल्यानंतर प्रति मे.टनास १००/- रुपये अनुदान देण्यात येईल.

**२) खोडवा व्यवस्थापन :-**

**अ) खोडवा अनुदान :-** जे ऊस उत्पादक शेतकरी सन २०१९-२० चे गळीत हंगामासाठी खोडवा/निडवा ऊस पिक ठेवतील त्यांना सदरचा खोडवा/निडवा ऊस गळीतास आल्यानंतर प्रति मे. टनास १००/- रुपये प्रमाणे अनुदान देण्यात येईल.

**ब) खोडवा ऊसातील पाचट आच्छादन :-** जे शेतकरी सन २०१८-१९ चे गळीत हंगामात ऊस तुटल्यानंतर खोडवा ऊसात पाचट ठेवतील अशा ऊसातील पाचटाची प्रति एकरी १७५०/- रु. याप्रमाणे वसुलीचे अटीवर कुट्टी करुन देण्यात येईल. तसेच सदर पाचट कुजविण्यासाठी प्रति एकरी १ लिटर द्रवरुप डिकंपोस्टिंग कल्चर मोफत देण्यात येईल.

**२) ठिबक सिंचन :-** जे ऊस उत्पादक शेतकरी सन २०१९-२० चे गळीत हंगामाकरीता ठिबक सिंचनाखाली आडसाली, पुर्व हंगामी, सुरु व खोडवा/निडवा ऊस पिक घेतील त्यांना सदरचा ऊस गळीतास आल्यानंतर प्रति मे. टनास रक्कम रुपये १००/- प्रमाणे अनुदान देण्यात येईल.

तरी कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त खोडवा ऊस पिक घेण्यासाठी व ठिबक सिंचनवर ऊसाची लागवड करून वरीलप्रमाणे अनुदान योजनांचा लाभ घेण्यासाठी कारखान्याचे शेतकी ऑफिसमध्ये संपर्क साधावा ही विनंती.

कळावे,

आपले विश्वासू ,

| जगन्नाथ भाऊराव घुगरकर | भाऊसाहेब दामोधर कुटे | ॲड. माधवराव सावळेराम कानवडे |
| --- | --- | --- |
| कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि; अमृतनगर